RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक–कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ६] बुधवार, जानेवारी २८, २०२६/माघ ८, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक ९

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर

सुर्या मोठा प्रकल्प

प्राथमिक अधिसूचना

भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.

क्रमांक भूसंपादन / सुर्या मोठा प्रकल्प / अधिसूचना / कावि-०१/२०२६.—ज्याअर्थी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ (भाग-२)/ अ-२, दिनांक ११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३, खंड (झेडए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी तालुक्याकरिता उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), सुर्या प्रकल्प यांस पदनिर्देशित केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त जमीन" असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४ अ) नुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही :

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, सक्षम प्राधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त मालकास तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल :

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धी पुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची सक्षम प्राधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार सक्षम प्राधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी यांनी उक्त अधिनियमाखालील, जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी पालघर तालुक्याकरिता उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), सुर्या प्रकल्प, डहाणू यांस पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची एक

जमिनीचे वर्णन

गावाचे नाव - तवा, तालुका - डहाणू, जिल्हा - पालघर

अ.क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	आवश्यक जमिनीचे क्षेत्र अंदाजित (हे.आर) मध्ये
(१)	(२)	(३)
१.	१५पै	०.३३००
	एकूण	**०.३३००**

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजन स्वरूपात विवरण

प्रकल्पाचे नाव	सुर्या मोठा प्रकल्प, ता. विक्रमगड अंतर्गत सुर्या डावा तीर कालवा लघुपाट क्र. ६ कालव्यावरील सिंचन प्रकल्पासाठी भूमी संपादन, गाव तवा, ता.डहाणू, जि. पालघर.
प्रकल्पाचे वर्णन	सुर्या मोठा प्रकल्प, ता.विक्रमगड अंतर्गत सुर्या डावा तीर कालवा लघुपाट क्र. ६ कालव्यावरील सिंचन प्रकल्प. पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील सुर्या मोठा प्रकल्प, ता. विक्रमगड अंतर्गत सुर्या डावा तीर कालवा लघुपाट क्र. ६ कालव्यावरील सिंचन प्रकल्पासाठी भूमी संपादन करणेसाठी १००% प्रमाणात खर्च करून लघुपाट क्र. ६, कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचेकडून करण्यात येत आहे. डहाणू तालुक्यात ०१ गावाचे लघुपाट क्र. ६ करण्याचे काम सुरू आहे. सुर्या प्रकल्पांतर्गत सुर्या डावा तीर कालव्यावरील लघुपाट क्र. ६ च्या बांधकामासाठी आवश्यक असून सदर जमिनीचे क्षेत्र सूर्या डावा तीर कालव्यावरील लघुपाट क्र. ६ च्या बांधकामासाठी संपादित करणे आवश्यक आहे.
समाजाला मिळणारे लाभ	डहाणू, पालघर व विक्रमगड या तालुक्यात सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देणे. सद्यस्थितीत सुर्या डावा तीर कालवा लघुपाट क्र. ६ मधून सिंचनासाठी पाणी सोडण्यात येत आहे.

अनुसूची तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.

(१) प्रकल्पाचे बांधकाम

(२) प्रकल्पाचे परिचालक

(३) प्रकल्पाच्या देखभालीखाली

या कारणाकरिता जमिनीची आवश्यकता

अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)

शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांनी त्यांचे अधिसूचना क्र. एसआयए-२०२५/प्र.क्र.१४२/अ-२, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ द्वारे भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यामध्ये कलम १०क समाविष्ट केले असून त्यामध्ये अशी तरतूद केली आहे की, समुचित शासनाला जनहिताच्या दृष्टीने अधिसूचनेद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देता येते. त्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण क्रमांक ४०८, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ नुसार जनहिताच्या दृष्टीने लोकहितकारी प्रकल्प असल्याकारणे प्रकरण दोन आणि प्रकरण तीन च्या तरतुदी लागू करण्यापासून उक्त प्रकल्पाला सूट देण्यात आली आहे.

अनुसूची पाच

अ	**प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम**	**उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) सूर्या प्रकल्प, डहाणू.**
ब	**प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता**	**जिल्हा मुख्यालय पालघर, भूसंपादन शाखा, दालन क्र. १०७, पहिला मजला, पालघर, बोईसर रोड, कोळगाव, ता. जि. पालघर ४०१ ४०४.**
क	**ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील**	**महाराष्ट्र शासन राजपत्र**, असाधारण भाग चार-अ, वर्ष ११, अंक ११४(७) बुधवार, सप्टेंबर १७,२०२५/भाद्रपद २६, शके १९४७, महसूल व वन विभाग अधिसूचना, दिनांक १७ सप्टेंबर २०२५ अन्वये उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांची प्रशासक, पुनर्वसन व पुनर्स्थापना म्हणून नियुक्ती करणेत आली आहे.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कलम ११ चे उप कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), पालघर यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

पालघर,
दिनांक २३ जानेवारी २०२६.

महेश सागर,
सक्षम प्राधिकारी,
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
सुर्या प्रकल्प, डहाणू.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.